# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.02.2026** **वारःगुरुवार**

1. भारत-अमेरिका व्यापार करारात देशातल्या कृषी आणि खतं क्षेत्रांबद्दल काळजी घेण्यात आल्याची केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांची ग्वाही
2. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक सुरू
3. मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून गंभीर दखल आणि,
4. 19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारताचा अंतिम फेरीत प्रवेश

**संसद**

भारत-अमेरिका व्यापार करारात देशातल्या कृषी आणि खतं या क्षेत्रांबद्दलची संवेदनशीलता लक्षात घेऊन ती संरक्षित राहतील, याची काळजी घेण्यात आली आहे, असं ठाम प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी काल संसदेत केलं. भारत-अमेरिका व्यापार कराराविषयी त्यांनी निवेदन केलं. या करारात भारतानं आपल्याला महत्वाच्या क्षेत्रांमध्ये हित साधलं आहे, असं गोयल म्हणाले.

राज्यसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावरची चर्चा पुढे सुरु राहिली. केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी देशाच्या विकासाचा आढावा घेतला, तर वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी भारत-अमेरिका व्यापार कराराबद्दल सभागृहाला माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या काळात देशात सामाजिक न्याय आणि सौहार्द लयाला गेल्याचा आरोप राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला.

**स्वागत**

भारत अमेरिका व्यापार कराराचं स्वागत उद्योग जगताकडून मोठ्या प्रमाणात होत आहे. लघुउद्योग भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रवींद्र वैद्य आकाशवाणीशी बोलतांना म्हणाले.....

**अमेरिकेनी कमी केलेला आयात शुल्काचा सकारात्मक परिणाम भारतीय उद्योगावर नक्कीच होणार आहे कारण आपण जर ती बातमी नीट बघितली तर त्यामध्ये इतर देशांपेक्षाही भारतावरती हा आयात कर कमी आहे तुलनेमध्ये ब्राझील असेल, चीन असेल, मेक्सिको असेल, थायलंड असेल आणि बांगलादेश या देशांपेक्षाही कमी आयात शुल्क आहे तर नक्कीच भारतीय उद्योग आणि त्यातल्या त्यात जो श्रमप्रधान किंवा श्रमिक प्रधान अशी जी इंडस्ट्री आहे जी की प्रामुख्याने एमएस, सेक्टर मध्ये काम करते जसे की टेक्सटाईल असतील, लेदर असेल, जेम्स एंड ज्वेलरी असेल, ऑटो कंपोनेंट्स असतील एवढं कशाला इव्हन फिशिंग इंडस्ट्री ला सुद्धा नक्कीच याच्यातून एक चांगला रिलीफ किंवा सकारात्मक परिणाम होणार आहे आणि त्यांना अमेरिकेची कवाडं पुन्हा खुली होणार आहेत. ह्या सगळ्या घटनेमुळं आपल्या इंडस्ट्री ला निश्चित प्रोत्साहन मिळेल रोजगार निर्मिती सुद्धा खूप प्रमाणात होईल आणि याचा भारतीय उद्योजक विशेषतः एमएसएमई नक्कीच फायदा घेईल असा विश्वास मला वाटतो.**

**RBI-पतधोरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक काल सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखालील सहा सदस्यांची  समिती उद्या पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करेल.

**पंतप्रधान-मलेशिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी 7 आणि 8 फेब्रुवारी दरम्यान मलेशियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या आमंत्रणावरून हा दौरा होणार आहे. या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी मलेशियाच्या पंतप्रधानांशी द्विपक्षीय चर्चा करणार असून सहकार्य वृद्धीसाठी विविध उद्योगांच्या प्रतिनिधींशी बैठका घेतील.

**मुख्यमंत्री**

श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरी यांच्या समाधी मंदिरामुळे भावी पिढ्यांसाठी एका प्रेरणास्थळ निर्माण झाल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल हरिद्वारमध्ये व्यक्त केली. श्री स्वामी सत्यमित्रानंद गिरीजी महाराज यांच्या समाधी मंदिरात श्रीविग्रह मूर्ती स्थापना समारंभात मुख्यमंत्री प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते.
लाडकी बहीण किंवा इतर कोणत्या योजनेला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नाव देण्याबद्दल सर्व संमतीने निर्णय घेतला जाईल, असं फडणवीस यांनी हरिद्वारमध्ये पत्रकारांशी बोलतांना सांगितलं.

**निवडणूका**

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी काल दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाला होता. भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आले, आणि महापौर पदासाठी भाजपाचे धीरज सूर्यवंशी आणि उपमहापौर पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन मगदूम यांचे अर्ज दाखल झाले. ही निवडणूक बिनविरोध झाली असली तरी अधिकृत घोषणा 10 तारखेला करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या महापौर पदासाठी भाजपाचे रवी लांडगे यांचं नाव निश्चित झालं असलं तरी उपमहापौरपदासाठी निवडणूक होणार आहे. भाजपाकडून शर्मिला बाबर यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून वैशाली काळभोर यांनीही उपमहापौरपदासठी अर्ज दाखल केला आहे. राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राष्ट्रवादीने महापौर पदाची निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

**नदी-जोड**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी नदीजोड प्रकल्पांतील कामांना गती देण्याच्या दृष्टीनं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी काल मुंबईत सविस्तर आढावा बैठक घेतली. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प, दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प तसंच कृष्णा खोऱ्यातलं पुराचं पाणी भीमा नदी खोऱ्यात वळविण्यासाठी सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा यावेळी घेण्यात आला. कोकणातल्या जलसमृद्ध खोऱ्यांमधलं अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून नाशिक आणि मराठवाडा भागातील पाणीटंचाई दूर करण्याचं लक्ष्य असल्याचं विखे पाटील यांनी सांगितलं.

**हवामान**

पुण्यातील कृषि महाविद्यालयाच्या हवामानशास्त्र विभागात-सुदूर संवेदन आणि जीआयएस यांचा कृषि हवामानशास्त्रातील वापर - या विषयावर देशभरातील शास्त्रज्ञांकारिता 10 दिवसांच्या प्रशिक्षणाचं आयोजन करण्यात आलं आहे. आणंद कृषि विद्यापीठ आणि कामधेनु पशुवैद्यकीय विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एम. सी. वार्ष्णेय यांच्या हस्ते काल या प्रशिक्षण कार्यक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. याविषयीचा हा वृत्तांत माझे सहकारी प्रशांत जाधव यांच्याकडून...

**पावसाचा अचूक अंदाज हा शेती नियोजनाचा कणा असून शेतकऱ्यांचं संपूर्ण जीवन, हवामान आधारित संशोधनावर अवलंबून आहे. मात्र, हवामानशास्त्रज्ञ पाऊस आणि तापमान यावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत, ही शास्त्रज्ञांची मर्यादा असल्याचं डॉक्टर वार्षेय यांनी आपल्या भाषणात सांगितलं. तरीसुद्धा अचूक हवामान अंदाजासाठी अनेक वर्षांची अचूक आणि सातत्यपूर्ण माहिती संकलित करणं अत्यावश्यक असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. कृषि हवामानशास्त्र विभागाचा पुण्यातील इतिहास सांगताना ते म्हणाले की सन 1932 मध्ये शास्त्रज्ञ एल. ए. रामदास यांनी सर्वप्रथम हवामानशास्त्राचा अभ्यासाची सुरुवात पुणे कृषि महाविद्यालयात केली आणि त्यासाठी उस पिकाची निवड केली. महाराष्ट्रातील नऊ हवामान आधारित विभागांचा विचार करून नक्षत्रांवर आधारित पावसाचं कॅलेंडर तयार करण्यात आलं होतं. हवामानाच्या आधारे अंदाजे पाचशेपेक्षा अधिक कृषी सल्ले विकसित करण्यात आले असून, नक्षत्रावर आधारित वर्षा या विषयावर आचार्य पदवीचं संशोधनही करण्यात आलं आहे. विशेषतः बारा ज्योतिर्लिंगांच्या परिसरात ढगांना आकर्षित करण्याची नैसर्गिक क्षमता असल्याचं निरीक्षण नोंदविण्यात आलं असून, त्या**

**ठिकाणी सोमयाग करून अभ्यास करण्यात आला आहे. या निरीक्षणांचा अभ्यास ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं करण्याचाही विचार पुढे आला असल्याचं त्यांनी नमूद केलं. या प्रशिक्षणामध्ये गुजरात, केरळ, ओडिशा आणि महाराष्ट्रातील एकंदर 25 हवामानतज्ञ उपस्थित आहेत.**

**नदी-संरक्षण**

सोलापूर शहरात शहरीकरणामुळे नैसर्गिक नदी-नाल्यांच्या प्रवाहांत अडथळे निर्माण होण्याची शक्यता महानगरपालिकेनं लक्षात घेतली आहे. नदी-नाल्यांचे नैसर्गिक प्रवाह संरक्षित करण्यासाठी ते विकास आराखड्यात समाविष्ट करण्यात आले आहेत. तसंच नैसर्गिक नदी-नाल्यांचे प्रवाह दर्शविणारा स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन आराखडाही यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामुळे नदी-नाल्यांच्या मार्गातली अतिक्रमणे टाळता येणार आहेत.

**एक्स्प्रेस-वे-अपघात-कोंडी**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर गॅस टँकरच्या अपघातामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होऊन वाहन चालकांना झालेल्या त्रासाची गंभीर दखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. या पुढील काळात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी मुंबई पुणे द्रुतगती महामार्गासाठी विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा तयार करण्याचे निर्देश शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अर्थात एमएसआरडीसी तसंच पोलिसांना दिले आहेत.

द्रुतगती महामार्गावर आडोशी बोगद्याजवळ प्रोपेलिन गॅसची वाहतूक करणारा मंगळवारी संध्याकाळी टँकर उलटल्यामुळे झालेल्या वाहतूक कोंडीत 32 तास वाहने अडकली होती. या कोंडीचा परिणाम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस सेवांवरही झाला. राज्यातल्या विविध विभागांमधल्या एकंदर 139 बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या. तसंच एक्सप्रेस वेवर 163 बस गाड्या कोंडीत अडकल्या होत्या. दरम्यान, वाहतूक कोंडी फुटली असून आज पहाटेपासून वाहतूक सुरळीत झाल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आलं.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील युवकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारतानं काल अफगाणिस्तानला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला. झिम्बाब्वेमधल्या हरारे इथं झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात सामन्यात अफगाणिस्ताननं ठेवलेलं 310 धावांचं आव्हान भारतानं 3 गड्यांच्या मोबदल्यात सहज पार केलं. आरॉन जॉर्जनं 115 तर वैभव सूर्यवंशीनं 68 धावा फटकावल्या.
अंतिम फेरीत भारताचा सामना शुक्रवारी इंग्लंडशी होणार आहे. भारतानं या पूर्वी पाच वेळा युवा क्रिकेटचं जगज्जेतेपद पटकावलं आहे.

**हवामान**

उत्तर मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात सरासरीपेक्षा लक्षणीय वाढ झाली असून इतरत्र तापमान सरासरीच्या जवळपास आहे. राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून त्यात सध्या बदल संभवत नसल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार